**ग्रामपंचायत देवटाकळी, ता.शेवगाव येथील कार्यालयीन कामकाजामध्ये हलगर्जीपणा केल्याबाबत व सेवा निलंबन कालावधी निर्णय घेणेबाबत. ( श्री. नरसाळे अशोक बप्पासाहेब, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत देवटाकळी, ता.शेवगाव)**

अहिल्यानगर जिल्हा परिषद
ग्रामपंचायत विभाग
आदेश जा.क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/ १९७ /२०२६
दिनांक २५/०५/२०२६

संदर्भ- १.दिनांक १०.१२.२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.अहिल्यानगर यांनी ग्रामपंचायत देवटाकळी, ता.शेवगाव येथे दिलेली भेट
२.कार्यालयाकडील सेवानिलंबन आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३०१/२०२५,दि.११/१२/२०२५
३.गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांचे पत्र क्र. आस्था-२/६५२/२०२५, दि.२३/१२/२०२५
४.या कार्यालयाकडील पुन:स्थापित आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३०/२०२६,दि.१९.०१.२०२६.
५.या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/१८३/२०२६,दि.१८/०५/२०२६.
६.या कार्यालयाकडील सेवानिलंबन कालावधी नोटीस क्र.ग्रापं-३/१८२/२०२६, दि.१८/०५/२०२६.
७.गटविकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/६८१/२६, दि.२०/५/२०२६
८.या कार्यालयाकडील ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्राप-३/१९६/२०२६ दि. २५ / ०५ /२०२६

श्री. नरसाळे अशोक बप्पासाहेब हे ग्रामपंचायत देवटाकळी, ता.शेवगाव येथे ग्रामपंचायत अधिकारी या पदावर कार्यरत असताना ग्रामपंचायत कार्यालयीन कामी पुर्णवेळ उपस्थित न राहणे, कर आकारणी व कर वसुली मध्ये अक्षम्य दुर्लक्ष असणे, ग्रामपंचायत अभिलेखे अपुर्ण असणे तसेच मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानामध्ये असमाधानकारक कामकाज असणे याबाबी संदर्भ क्र.१ अन्वये दिलेल्या भेटीमध्ये दिसुन आलेल्या होत्या. त्यामुळे श्री. नरसाळे यांना संदर्भ क्र.२ च्या आदेशानुसार जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबित करण्यात आले होते.

श्री. नरसाळे यांच्या सेवानिलंबन कालावधीचा निर्णय घेनेसाठी संदर्भ क्र.६ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (५) (७) मधील तरतूदीनुसार दि.२३/१२/२०२५ ते दि.०१/०२/२०२६ असा एकूण ४० दिवस निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणून का समजण्यात येऊ नये? याबाबतची नोटीस देण्यात आली होती.

श्री. नरसाळे यांचा खुलासा संदर्भ क्र. ७ अन्वये गटविकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांच्यामार्फत प्राप्त झाला आहे. प्रस्तुत प्रकरणी श्री. नरसाळे यांना कामात हलगर्जीपणा झालेने संदर्भ क्र.८ अन्वये सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने श्री. नरसाळे यांचा खुलासा मान्य करुन दि.२३/१२/२०२५ ते दि.

०१/०२/२०२६ असा एकूण ४० दिवस निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ व्यतीत केलेला कालावधी म्हणुन मंजूर करण्यात येत आहे.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०५२५०६००८८ असा आहे.

आनंद भंडारी,(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

३. श्री. नरसाळे अशोक बप्पासाहेब, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती नेवासा
द्वारा गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा

४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा
२/-सदरच्या आदेशाची नोंद श्री. नरसाळे यांच्या मूळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. तसेच सदरचा आदेश संबंधितास बजावून आदेश बाजावलेची पोहोच उलट टपाली या कार्यालयास सादर करावी.